जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र 9819208279

प्रेस नोट

दिनांक – १४/०८/२०२६

बदलापूर पुर्व येथील सोनार यांची दागिन्यांची फसवणूक करून अपहार करणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखा घटक –४ उल्हासनगरकडून अटक.

बदलापूर पुर्व येथील आपटेवाडी रोड, मोरया ज्वेलर्स यांचे व त्यांचेकडे आलेल्या ग्राहकांच्या दागिन्यांची आरोपी नामे रोहित मल्हारी आंधळे याने त्यांचा विश्वास संपादन करून दागिने स्वत:कडे घेवून त्याचा अपहार केल्याने बदलापूर पुर्व पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३३८/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ३१८(४),३१६(२),३(२) प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर यांच्याकडून मा. वरिष्ठांचे आदेशाने संमातर तपास चालू असताना, गुन्हयातील फरार असलेला आरोपी हा अहिल्यानगर येथे लपवून बसल्याची बातमी इकडील नेमणूकीतील पोहवा/मगेंश जाधव यांना मिळाली. त्यांचे बातमीवरून गुन्हे शाखेच्या पथक वरिष्ठांचे आदेशाने अहिल्यानगर येथे रवाना झाले होते. सदर पथकाने त्यांचा अहिल्यानगर येथे शोध घेतला असता सदर फरारी आरोपी मिळून आल्याने, त्यास ताब्यात घेवून दि. २९/०७/२०२६ रोजी अटक केली होती.

पोलीसांचे अटकेतील आरोपी याचेकडे अधिक तपास केला असता, त्याने सदर गुन्हयातील फिर्यादी व त्यांच्या ग्राहकांचे दागिणे त्यांना फसवूण घेतल्याचे कबूल केले. सदर आरोपीस मा. न्यायालयास हजर केले असता, त्यास दि. १०/०८/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजूर करण्यात आली होती. पोलीस कस्टडी दरम्यान आरोपी रोहित मल्हारी आंधळे याचेकडून फसवणूकीतील रूपये **०१ कोटी १२ लाख ४२ हजार, २८३/–रूपयाचे ८६५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने** पोलीसांनी हस्तगत केले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/श्रीरंग गोसावी गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस सह आयूक्त सो, (गुन्हे), ,श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, (शोध–१) यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/राजेश गज्जल, सपोनि/श्रीरंग गोसावी, पोउनि/अशोक पवार, सपोउनि/बबन बांडे, पोहवा/गणेश गावडे, पो हवा/ राजेंद्र थोरवे, पो.हवा./मंगेश जाधव, पो.हवा/योगेश वाघ, पो.हवा/अशोक थोरवे, पोहवा/प्रकाश पाटील, पोहवा/ रितेश वंजारी, पोहवा/सतिश सपकाळे, पोहवा/अमर कदम, पो.हवा/चंद्रकात सांवत,पोहवा/सुरेश जाधव, पोहवा/शेखर भावेकर, पोहवा/मिलींद हिंदूराव, पोहवा/किशोर पाटील,पोशि/विक्रम जाधव, पोशि/बाबूलाल जाधव, पोशि/प्रसाद तोंडलीकर, पोशि/संजय शेरमाळे, पोशि/रेवणनाथ शेकडे, पो. शि/रामदास उगले, मपोहवा/मिनाक्षी खेडेकर, मपोना/कूसूम शिंदे, मपोशि/मनोरमा सावळे असे पोलीस पथकाने केली आहे

————————